५ - गोदातीर दि. 20/03/24

# स्थानिक गुन्हे शाखेकडून ४१ हजारांची देशी व विदेशी दारु जप्त, गुन्हा दाखल



**नांदेड–** लोकसभेची निवडणूक प्रक्रिया सुरू होताच जिल्ह्यात अवैध दारू विक्री व साठेबाजी रोखण्यासाठी पोलीस यंत्रणा अलर्ट झाली आहे. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने बारड शिवारात एका वाहनासह ४१ हजार रुपयांची देशी व विदेशी दारू जप्त केली आहे. ही कारवाई स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक आशिष बोराटे यांच्या पथकाने केली.

जिल्ह्यात देशी व विदेशी तसेच हातभट्टी दारूची अवैध विक्री होणार नाही यासाठी पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी आपल्या अधिनस्त अधिकाऱ्यांना कारवाई करण्याच्या सूचना दिल्या. यावरून स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांचे सहकारी अधिकारी उपनिरीक्षक आशिष बोराटे व त्यांची टीम सोमवार दि. १८ मार्च रोजी मुदखेड तालुक्यात गस्त घालत होती. फरार व पाहिजे आरोपी सोबतच अवैध दारू विक्री व साठा करणाऱ्यांच्या मुसक्या आवळण्यासाठी पथक कार्यरत होते. पथकप्रमुख बोराटे यांना मिळालेल्या माहितीवरून त्यांनी मुदखेड ते बारड रस्त्यावर देशी व विदेशी दारू वाहतूक करणाऱ्या एका महिंद्रा बोलेरो वाहनाला तपासणीसाठी थांबविले. यावेळी सदर वाहनातून देशी व विदेशी दारू ४१ हजार ६४५ रुपयाची जप्त केली. पोलिसांनी किशनराव विठ्ठलराव तिडके याच्याविरुद्ध बारड पोलीस ठाण्यात तक्रार दिली.

स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने वाहन व दारु असा नऊ लाख ४१ हजार ६४५ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. आशिष बोराटे यांच्या फिर्यादीवरून किशनराव तिडकेविरुद्ध बारड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.